## प्रेस नोट ता.०२/०९/२०२०

## हायवे रोडला लुटमार करून गुन्हे करणारी टोळी जेरबंद, २८ लाखाचा माल हस्तगत, पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

दि.०१/०९/२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांचे आदेशानुसार गुन्हे शाखा, युनिट १ कडील पोलीस उप निरीक्षक काळुराम लांडगे, पो.ना.सोमनाथ बोऱ्हाडे, पो.शि.विशाल भोईर, गणेश सावंत, नितीन खेसे, प्रमोद हिरळकार, सुनिल चौधरी यांचे पथक गणेश उत्सवाचे अनुशंगाने भोसरी, एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन हद्दीतील तडीपार, पाहीजे फरारी आरोपी व रेकॉर्ड वरील गुन्हेगार चेक करीत असताना पो.शि.विशाल भोईर, नितीन खेसे, गणेश सावंत यांना माहिती मिळाली की, भोसरी व चिखली परीसरात राहणाऱ्या ७ ते ८ इसमांनी मिळुन चाकण शिक्रापुर रोडवरून ड्रायव्हरला मारहाण करून, त्यांचे हात व पाय बांधुन त्यांचे तोंडाच चिकटपट्टी लावुन, त्यांना लांब शेतामध्ये सोडुन त्यांचेकडील लोखंडी स्टीलने भरलेला १८ चाकी ट्रेलर चोरी केला असुन ते ट्रेलर मधिल लोंखडी स्टील भोसरी,एम.आय.डी.सी. दिघी परीसरात कोठेतरी विक्री करणार आहेत. अशी खात्रीशीर माहिती मिळताच वपोनि उत्तम तांगडे यांचे मार्गदर्शनाखाली व सुचना प्रमाणे वरील पोलीस पथकाच्या वेगवेगळ्या चार टिम तपास करून ट्रेलर गाडीचा शोध घेत असताना नाशिक रोडवरील गोडाऊनचौक येथे एक स्टील भरलेला ट्रेलर व त्यामध्ये दोन इसम दिसले. ट्रेलरच्यापुढे एक स्वीफ्ट डिझायर त्यामध्ये तीन इसम तसेच ट्रेलरच्या पाठीमागे असलेल्या रिक्षामध्ये दोन इसम असल्याचे दिसले. तेव्हा त्याबाबत बातमीदार याचेशी संपर्क साधुन ट्रेलर बाबत खात्री करून ट्रेलर, स्वीफ्ट व रिक्षामध्ये असलेल्या इसमांना मोठ्या सिताफीने पकडुन त्यांन पत्ता विचारता त्यांनी त्यांची नामे १) सतिश मारूती पाटील, वय ३१ वर्षे, रा.लांडेवाडी झोपडपट्टी, भोसरी, पुणे, २) विशाल आरूण कांबळे, वय ३० वर्षे,रा.चिखली पुणे, मुळ गांव केज, जि.बीड, ३) बळीराम सदाशिव आलदे, वय २२ वर्षे, रा. भोसरी, पुणे, मुळ गाव- कर्नाटक ४) पंकज गौतम वाघ, वय २२ वर्षे, रा. चिखली पुणे, गांव केज, जि.बीड, ५) योगेश शहाजी डोकेफोडे, वय १८ वर्षे, रा. रूपीनगर, तळवडे, पुणे, मुळ गांव बीड, ६) अशोक गणपत कांबळे, वय २५ वर्षे, रा. चिखली, पुणे, मुळ गांव - भुम, जि.उस्मानाबाद, ७) मंगेश शिवाजी लोखंडे, वय ३५ वर्षे, रा. चिखली पुणे असे असल्याचे सांगितले.

त्यांना ताब्यात घेवुन गुन्हे शाखा, युनिट १ कार्यालय येथे आणुन त्यांच्याकडे एकत्रित तपास करता त्यांनी दि.०१/०९/२०२० रोजी पहाटे २.०० वा. त्यांचेकडील स्वीफ्ट कार व रिक्षाने चाकण ते शिक्रापुर रोडवर फिरून शिक्रापुर कडुन चाकणच्या दिशेने येणाऱ्या लोखंडी स्टीलने भरलेल्या ट्रेलरला स्वीफ्ट कार आडवी लावुन ट्रेलरचा चालक व क्लिनरला हाताने मारहाण करून त्यांना ट्रेलरमधुन खाली उतरून त्यांचे हातपाय बांधुन तोडांस चिकपट्टी लावुन त्यांना स्वीफ्ट डिझायरमध्ये बसवुन शिक्रापुर रोडवर रासे गावचे शिवारात सोडुन दिले. तसेच इतर

आरोपी लोंखडी स्टीलने भरलेला ट्रेलर पुण्याच्या दिशेने गेल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याबाबत ट्रेलरचा चालक ब्रिजेशकुमार मोतीलाल विश्वकर्मा, रा.नागपुर यांनी दिलेल्या फिर्यादी वरून चाकण पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं.९५९/२०२० भादवि कलम ३९५ अन्वये दरोड्याचा गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले आहे. आरोपीकडुन गुन्ह्यात चोरीस गेलेले एक ट्रेलर, ३२ टन लोखंडी स्टील तसेच गुन्हा करणे करीता वारलेली स्वीफ्ट डिझायर व ॲटो रिक्षा असा एकुण २८ लाख रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपी यांचा मुख्य सुत्रधार हा केज, जि.बीड येथे राहणेस असुन तो टोळीचा प्रमुख आहे. त्याचे संपर्कात राहुन आरोपी यांनी गुन्हा केल्याचे सांगत आहेत. त्याचे बाबत अधिक माहिती घेतली असता तो पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन आरोपी विशाल कांबळे याचे विरूध्द चोरी,जबरी चोरी, दरोडा, स्त्री अत्याचार असे कोल्हापुर, केज, नांदेड, ठाणे या ठिकाणी गुन्हे दाखल आहेत.

आरोपी विशाल कांबळे याने त्याचे साथीदारासह दि.८/०६/२०१९ रोजी जेजुरी पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण चे हद्दीतुन निरा गाव येथुन ट्रक चोरी केल्याची कबुली दिली असुन त्याबाबत खात्री केली असता जेजुरी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं.२१५/२०१९ भादवि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहा.पोली निरीक्षक गणेश पाटील, पोलीस उप निरीक्षक काळुराम लांडगे, तसेच पोलीस कर्मचारी सोमनाथ बोऱ्हाडे, नितीन खेसे, विशाल भोईर, गणेश सावंत, सुनिल चौधरी, प्रमोद हिरळकर यांचे पथकाने केली आहे.